अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. ०३/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ५७९ दि. 20/04/2019

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०३/२०१९

**श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड**
फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी,
पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड** रा. फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी, पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ०१.०२.२०१९ रोजी अर्ज करून "मनपा आरोग्य खाते बायोकेमिस्ट पदास तांत्रिक/ अतांत्रिक यापैकी हे पद अतांत्रिक यापैकी हे पद अतांत्रिक असल्यास त्या पदास एल.जी.एस. वेतनवाढी ३ देनेबाबत कार्यालयीन परिपत्रके व शासन निर्णय याची माहिती मिळणे बाबत" माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र.जमाअ/आस्था/९८७३ दि. ०६.०२.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०१.०२.२०१९ | ०१.०२.२०१९ | ०३.०३.२०१९ | ०६.०२.२०१९ | - |

अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी अपील क्र. ०३/२०१९ चा अपील अर्ज दि. ०५.०३.२०१९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०५.०३.२०१९ | ०५.०३.२०१९ | ०३.०४.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १६.०३.२०१९ रोजी सुनावणी आंयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड** रा. फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी, पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७ हे उपस्थित होते. श्री संदीप खेडेकर हुद्दा वरिष्ठ लिपिक, **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी हे उपस्थित होते

**विवेचन**

अपिलार्थी **श्री पांडुरंग निवृत्ती गायकवाड** रा. फ्लॅट नं. एफ २०२ मिथीला नगरी, पिंपळे सौदागर, पुणे ४११०२७ यांनी त्यांचे म्हणणे लेखी अपिलात सादर केले. तर श्री संदीप खेडेकर हुद्दा वरिष्ठ लिपिक, **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/९८७३ दि. ०६.०२.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील जी माहिती अस्थापना विभागाकडे उपलब्ध आहे ,परंतु अपिलार्थीस मिळाली नाही अशी माहिती इंडेक्स करून ७ दिवसात **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपील क्र. ३/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका